जावक क्र.- ६६९४/२०१७
बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे
दिनांक- २५/१०/२०१७

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
यांना सविनय सादर

प्रतिवेदक :- आर.व्ही. टेमगिरे, पोलीस उप-निरीक्षक, बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे
याज कडून विनंती पुर्वक की,

विषय :- फुस लावून पळवुन नेलेल्या मुलांची माहिती प्रसिध्दी माध्यमांना कळविणे बाबत.

संदर्भ :- बंडगार्डन पो.स्टे. गु.रजि.नं. १११/२०१६, भा.दं.वि. कलम- ३६३ चे बाबत

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सविनय सादर की, बंडगार्डन पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. १११/२०१६, भादविक.- ३६३ अन्वये दाखल गुन्हयामधील फिर्यादी नामे रमेश वसंत-सोनवलकर, वय- २५ वर्षे, धंदा- नोकरी, रा- लेन नं. ३, साठे नगर, लोहगाव, पुणे मोबा. नं. ९६६५४८०९२३. हे साथी संस्था, लेन नं.-१७, लुम्बीनी नगर, प्रायव्हेट रोड, पुणे या संस्थेत प्रोग्रॅम को-ऑडिनेटर या पदावर नोकरीस असुन सदर संस्था ही पुणे रेल्वे स्थानकावर हरविलेल्या मुलांची संरक्षण व काळजी घेऊन त्यांचेसाठी खुले निवारा गृह आहे. त्यांचे संस्थेत दि.१३/०४/२०१६ रोजी ०८.०० वा.चे. सुमारास खालील तिन मुले पुणे रेल्वे स्थानकावरुन विना पालकांची मिळुन आल्याने आणली होती. दिनांक १५/०४/२०१६ रोजी सकाळी ८.०० वा.चे सुमारास सदर तिन मुले संस्थेत मिळुन आली नाही. त्यांस कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे, म्हणुन अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल आहे. सदर तिन मुलांचे वर्णन खालील प्रमाणे -



१)- नाव – प्रकाश दुधेराम, वय-१२ वर्ष, रा. मु.पो. बाली, जि. पाली, राज्य - राजस्थान, रंगाने- काळा, उंची -४ फुट, चेहरा - उभट, नाक - सरळ, अंगाने - मध्यम, अंगात पांढरा फुल शर्ट त्यावर निळ्या फुलांची डिझाईन व काळे रंगाची पॅन्ट, हिंदी - राजस्थानी भाषा बोलतो.



२)- नाव – उत्तम निशाद, वय-१३ वर्ष, रा. मु.पो. मंगेडघाटा, ता. नादघाट, राज्य – छत्तीसगड, रंगाने- गोरा, उंची -४ १/२ फुट, चेहरा - उभट, नाक - सरळ, अंगाने - सडपातळ, अंगात हिरव्या रंगाचा टी शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, डावे हाताचे पोटरीवर छ असे इंग्रजी अक्षर गोंदलेले, हिंदी भाषा बोलतो.



३)- नाव – कोमल यादव, वय-११ वर्ष, रा. मु.पो. मंगेडघाटा, ता. नादघाट्र, राज्य – छत्तीसगड, रंगाने- गोरा, उंची -४ फुट, चेहरा - उभट, नाक - सरळ, अंगाने - सडपातळ, केस - वाढलेले, अंगात

आकाशी रंगाचा पांढ-या रेषांचा शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, उजवे हाताचे पोटरीवर कोमल असे गोंदलेले, हिंदी भाषा बोलतो.

येणेप्रमाणे पळवून नेलेल्या मुलांचा फोटो सोबत जोडला असुन, फोटो आपले वर्तमान पत्रात प्रसिध्द होणेस व कोणालाही मिळून किंवा दिसून आल्यास खालील नमूद क्रंमाकावर तात्काळ संपर्क साधणेबाबत विनंती आहे.

संपर्क क्रंमाक- बंडगार्डन पो.स्टे. (१) ०२०-२६१२३८२५. (२) ०२०-२६२०८२२६